**Vatsalya Trust Mumbai**
**Drive with Pride**
**Impacting Lives of Aspirant**

**विशाल यादव :**



विशाल यादव विशाल यादव हा राहणार ऊरुणवाडी, तालुका वाळवा, जिल्हा सांगली. येथील आहे. त्याचा एक छोटासा परिवार आहे. आई, वडील, बहीण आणि तो स्वतः असं त्यांचं कुटुंब आहे. वडील सेंटरिंग चे काम करतात. आई घरीच असते. बहिण लहान आहे ती सध्या शिक्षण घेत आहे. वडिलांनी मोलमजुरी करून विशाल यांना बीसीए शिक्षण दिलेले आहे, सदरील शिक्षणावर आधारित ब्रिटानिया बिस्किट कंपनी मध्ये तो अकाऊटंट म्हणून केवळ 4000/- रु पगारामध्ये काम केआरटी होता. इतर कोणत्याही ट्रेनिंग किंवा शिक्षण त्यांनी घेतलेले नाही पण त्यांना काहीतरी ट्रेनिंग घ्यायची होते जेणेकरून त्यांच्या वडिलांना आता या वयात काहीतरी थोड्याफार आर्थिक हातभार लागेल. तसेच त्यांची लहान बहिणीचे शिक्षण लग्न या जबाबदाऱ्या आहेत.

त्याला त्याच्या मित्राकडून वास्तल्य ट्रस्ट मुंबई व प्रेरणा फाऊंडेशन येडेनिपाणी यांच्या कडून 4 व्हीलर चे ट्रेनिंग बाबतची माहिती मिळाली. माहिती मिळताच कशाचाही विचार न करता लगेच ऍडमिशन घेतली आणि एक महिन्याचे ट्रेनिंग पूर्ण केले. आता सध्या तो अकाउंटंट विथ सेल्समन म्हणून ब्रिटानिया कंपनीमध्ये काम करत आहेत. त्याला आता महिन्याला 10000-12000 इतका पगार मिळतो. त्यामुळे त्यांच्या वडिलांचा भार थोडा कमी झाला. कामावरती जाण्यासाठी वेळेत पोहोचण्यासाठी तसेच कंपनीच्या कामासाठी त्याला गाडीचा वापर करता येतो आणि या सगळ्यामुळे त्यांच्या घरातील आई-वडील सर्वजण खुश आहेत.

वात्सल्य ट्रस्ट मुंबई आणि प्रेरणा फाउंडेशन यांनी दिलेल्या प्रशिक्षणामुळे त्याला स्वतःचा आर्थिक विकास करणेस खूप मदत झाली, त्यामुळ विशालने वात्सल्य ट्रस्ट मुंबई व प्रेरणा फाउंडेशन यांचे आभार मानले.

Photographs:








